पनवेल(प्रतिनिधी) सुवर्ण जयंती राजस्व अभियानातंर्गत श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि पनवेल तालुका महसूल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कळंबोलीत शनिवारी झालेल्या शासकीय विविध दाखले वाटप शिबीराचा १८१८ जणांनी लाभ घेतला. त्याचबरोबर या शिबीरात मतदार नोंदणी कार्यक्रमही पार पडला. या शिबीराचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

या शिबीरास प्रमुख पाहुणे म्हणून पनवेलचे तहसीलदार पवन चांडक, नायब तहसीलदार श्री.वाघमारे, प्राचार्य लहु पांचाळ, जिल्हा कॉंग्रेसचे उपाध्यक्ष सुदाम पाटील, कळंबोली विभागीय अध्यक्ष बुधाजी ठाकूर, तालुका उपाध्यक्ष बशीर पटेल, कळंबोली कार्याध्यक्ष अशोक मोटे, पनवेल तालुका युवक अध्यक्ष अमर पाटील, एनएसयुआयचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवक अध्यक्ष वीर सिंग, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष जाकीर खान, महिला कॉंग्रेसच्या विभागीय अध्यक्षा रोहिणी साखरकर, सुदेष्णा रायते, चंद्रकला शिरावले, करूणा शेलार, रूपाली शिवतरे, मनिषा निकम, प्रियंका पवार, कुंदा गोळे, रविनाथ पाटील, भागवत पाटील, आशा गवळी, धर्मशीला झा, अरूण ठाकूर, सागर पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

**एकाच ठिकाणी त्या-त्या संदर्भातील दाखले मिळणे ही अत्यंत सोयीस्कर बाब आहे.त्यामुळे धावपळ, वेळ व पैशाची बचत होते.अशा शिबीरांच्या माध्यमातून लोकांना सहजतेने दाखले मिळणार असल्याने अशा शिबीरांचे आयोजन शैक्षणिक व सामजिकतेच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. कळंबोलीत नागरिकांना सिडकोच्या माध्यमातून योग्य त्या सोयीसुविधा मिळाल्या पाहिजे, म्हणून कळंबोली कॉंग्रेस नेहमी सतर्क राहून काम करीत असुन वेळ पडल्यास सिडकोला धडक देवून नागरिकांच्या समस्या सोडविण्याचे काम कळंबोली कॉंग्रेसच्या माध्यमातून होत असते. - आमदार प्रशांत ठाकूर**

**शालेय प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना लागणाऱ्या दाखल्यांसाठी घाई-गडबड आणि गर्दीला सामोरे जावे लागते.अशावेळी पाल्य, पालक आणि तहसिल कार्यालय यांच्या कामावर फार मोठा ताण पडतो.या सर्वांचा वेळ, धावपळ तसेच पैसे वाचविण्याच्या दृष्टीने आणि शासनाच्या उपक्रमामध्ये सहभाग घेवून लोकांची मदत करण्याचे काम श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व पनवेल तालुका महसूल विभाग यांनी केला आहे. तहसीलदार पवन चांडक**

**दैनंदिन जीवनात विविध शासकीय दाखल्यांची गरज लक्षात घेता आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून दाखले वाटप शिबीरे आयोजित करण्यात येत आहे. काल मुंबईत मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासोबत झालेल्या बैठकीत पनवेलच्या विकासासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आणखी १६१ कोटी रूपयांचा निधी मंजूर करून घेतला आहे, त्यामध्ये कळंबोली येथे उडडाणपूल बांधण्याचे कामही आहे. त्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांचे आम्ही कळंबोलीवासियांच्यावतीने आभार मानतो.**

**- सुदाम पाटील**